## जाहीर नोटीस (१)

सर्व संबधीतांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून विकास हक्काच्या (डी.आर.) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

उपरोक्त नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र , गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी ,लीज, लीन, चार्ज , इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबध असल्यास संबधितांने प्रस्तूतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उपसंचालक नगररचना पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे - ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरुपात दयावी सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबध नाही असे समजून किंवा असल्यास संबधितांने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमीनीचा मोबदला डी.आर. च्या स्वरुपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) - मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे, पोट तुकडी मुळशी, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे ताथवडे येथील स.नं. ८१/१ पैकी मधील मे. व्हिजन बिल्डकॉन तर्फे भागीदार श्री. विपुलकुमार चिमनलाल भावाणी व श्री. नितेशकुमार सुरेशभाई पटेल यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील २४.०० मी. रूंद रस्त्याने बाधित होणारे ९६२.६९ चौ.मी. क्षेत्रापैकी ८२.५४ चौ.मी. क्षेत्राची जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे चतु:सिमा : -

मौजे ताथवडे येथील स.नं. ८१/१ पैकी मधील २४.०० मी. रूंद रस्ता या प्रस्तावाने बाधित क्षेत्राची चतु:सिमा : (एकूण बाधित क्षेत्र- ८२.५४ चौ.मी.)

उत्तरेस :- लागू स.नं. ८० ची मिळकत

पुर्वेस :- स.नं. ८१/१ पैकीची मिळकत

दक्षिणेस :- लागू स.नं. ८१/१ पैकीची अर्जदाराची उर्वरित मिळकत

पश्चिमेस :- लागू स.नं. ८१/१ पैकीची अर्जदाराची उर्वरित मिळकत

## जाहीर नोटीस (२)

संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधीत क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या ( टि.डी. आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्बेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी,लीज लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधीताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे. असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमिन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि डी आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) - मिळकतीचे वर्णन – तुकडी- पुणे , पोट तुकडी - मुळशी , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे वाकड येथील स.नं. ९८/१ पैकी मधील श्री. आनंदा गणपत विनोदे, श्री. तुकाराम गणपत विनोदे यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील २४.०० मी. रस्ता रूंदीने बाधित क्षेत्र ३७३.०० चौ.मी जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा-- :

मौजे वाकड येथील स.नं. ९८/१ पैकी मधील २४.०० मी. रस्ता रूंदीने बाधित क्षेत्राची

चतु:सिमा : ( बाधित क्षेत्र ३७३.०० चौ.मी )

पुर्वेस- - लागु स.नं. ९८ पैकीची अर्जदाराची उर्वरीत मिळकत

पश्चिमेस- लागु स.नं. ९८ पैकीची अर्जदाराची उर्वरीत मिळकत

दक्षिणेस- लागु स.नं. ९८ पैकीची मिळकत

उत्तरेस- लागु स.नं. ९७ ची मिळकत

परिशिष्ट २ ) - मिळकतीचे वर्णन – तुकडी- पुणे , पोट तुकडी - मुळशी , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे वाकड येथील स.नं. १६०/६ पैकी मधील श्री. दिलीप हरिभाऊ कु-हे व सौ. सिंधू दिलीप कु-हे यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील ४५.०० मी. रस्ता रूंदीने बाधित क्षेत्र ११५.०० चौ.मी जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा-- :

मौजे वाकड येथील स.नं. १६०/६ पैकी मधील ४५.०० मी. रस्ता रूंदीने बाधित क्षेत्राची

चतु:सिमा : ( बाधित क्षेत्र ११५.०० चौ.मी )

पुर्वेस- - लागु स.नं. १६० पैकीची मिळकत

पश्चिमेस- लागु स.नं. १६० पैकीची मिळकत

दक्षिणेस- लागु स.नं. १६० पैकी अर्जदाराची उर्वरित मिळकत

उत्तरेस- लागु रस्ता

जाहीर नोटीस (३)

सर्व संबंधितांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये नमूद केलेले पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील मंजूर विकास योजनेतील रस्त्याने बाधित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधिताकडून खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवासा सदर मिळकतीच्या हितसंबंधितांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

उपरोक्त मिळकतीवर खालील जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजेमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उपसंचालक नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे- ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत् येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क व हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधितांने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका तर्फे सदर जमीनीचा मोबदला खाजगी वाटाघाटीने मोबदल्याच्या स्वरूपात खालील जमीन मालकास अदा केला जाईल, व जमीन महापालिका ताब्यात घेतील. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे रावेत येथील स.नं. ७५/१अ/१अ/२ पैकी, मधील श्री. हनुमंत गंगाराम शेटे यांच्यामालकीच्या मिळकतीतील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील ४५.०० मी. रूंद रस्त्याने बाधित अंदाजे क्षेत्र २६५.०० चौ.मी जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे-

चतु:सिमा :-

| | |
|---|---|
| पुर्व | - स.नं.७५ पैकी मिळकत. |
| पश्चिम | - स.नं.७५ पैकी मिळकत. |
| दक्षिण | - स.नं.७५ पैकी मिळकत. |
| उत्तर | - लागू पानंद रस्ता व स.नं.७५ पैकी मिळकत. |

(राजेंद्र पवार)
उपसंचालक,
नगररचना व विकास विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११०१८

जाहिरात क्रमांक ४१
दिनांक ५/८/२०१९

सदरची जाहीर नोटीस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.